■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८३ ■ मंगळवार दि.१ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 283 ■ Tuesday Dt.1 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# कोचिंग क्लासेसमध्ये छळ झालेल्या अल्पवयीन मुलीने बालकल्याण समितीसमोर सांगितले नराधम शिक्षकांचे विकृत चाळे?

## पिडीत मुलीने शिक्षकांचे विकृत चाळे सांगितल्यावर बालकल्याण समितीने मान खाली घातली?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




# आरोपींना अटक होऊन पोस्कोअंतर्गत गुन्हा नोंद असताना दोन दिवसांचा पीसीआर कसा मागितला गेला?

## पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणाची चौकशी व्यवस्थित सुरु नसल्याचा आरोप; पोलिसांच्या या भूमिकेमुळे संशयाचे वातावरण निर्माण?

- आई-वडिलांना अश्रुंचा बांध फुटला, निर्दयी प्रशासनाला जाग कधी येणार?
- गुरु शिष्यांच्या नात्याला काळीमा फासला; नराधरामांना चांगली अद्दल घडवा पिडीत मुलीची मागणी!
- आरोपींच्या मागे कोणाचा राजकीय वरदहस्त आहे का? याचा शोध घेऊन सखोल चौकशी पोलीस प्रशासन करणार का?
- इतर मुलींच्या बाबतीत असा काही प्रकार घडला का, याचीही चौकशी होणे गरजेचे?

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील एका खासगी कोचिंग क्लासेसमध्ये नीटची तयारी करत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थीनीवर दोन प्राध्यापकांकडून लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. बीड शहरातील ही घटना गुरु शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारी आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक विजय पवार व प्रशांत खाटोकर यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा आणि महाराष्ट्रात खळबळ उडाली. पिडित मुलीने व तिच्या आईने हिंमत दाखवून आरोपींच्या विरोधात तक्रार दिल्यानंतर विजय पवार, खाटोकर यांच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. या घटनेबद्दल पालकांमध्ये आणि सर्वसामान्यांमध्ये संताप आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी या प्रकरणावरून शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघालं असतानाच आता या प्रकरणी आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. ती म्हणजे या प्रकरणातील पीडित मुलीला बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आलं होतं. यावेळी या पीडितेने तिच्यावर झालेल्या अत्याचाराचा संपूर्ण घटनाक्रम सांगितला आहे. जो ऐकून या तिच्या आई-वडिलांच्या अश्रुचा बांध फुटला.



पीडित मुलीने बालकल्याण समिती समोर सांगितलं की, शिक्षक प्रशांत खाटोकर तिला सतत बॅडटच करायचा. त्याने केबिनमध्ये बोलावून कपडे काढायला लावले आणि माझे फोटो काढले. मी त्याला प्रतिकार केला, लाथा बुक्क्या मारल्या पण तरीही त्याने ऐकलं नाही. त्यानंतर मी पोलिसांत तक्रार दिली.

त्याला आता चांगली अद्दल घडली पाहिजे, असं पीडितेने सांगितलं. शिवाय विजय पवार याने देखील असाच त्रास दिल्याचंही विद्यार्थीनीने सांगितलं आहे. दरम्यान, मुलीची आपबिती ऐकल्यानंतर बालकल्याण समितीने पीडीतेला महिला सहायक दिली आहे. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित आणखी कोणी पीडित असेल किंवा कुणाला काही माहिती किंवा पुरावे द्यायचे असतील तर त्यांनी पोलीस अधीक्षक किंवा शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या तपासी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन बीड पोलिसांनी केलं आहे.

### लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी; मुख्यमंत्र्यांकडून घोषणा!

प्रकरणाची व्याप्ती आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन एसआयटी समिती स्थापन करू. महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ही समिती काम करेल. यामागे कोण आहेत, कोणाचा राजकीय वरदहस्त आहे का? याचीही चौकशी केली जाईल. प्रकरणाचा छडा लावून टाईमबॉन्ड पद्धतीने तपास केला जाईल. आरोपींना कठोर शिक्षा होईल, आरोपींना कोणाचा राजकीय वरदहस्त असेल तर त्याचा तपास करून त्यांनाही शिक्षा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. विशेष म्हणजे कालच, माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना बीड लैंगिक अत्याचार प्रकरणाची चौकशी एसआयटी मार्फत करावी, अशी मागणी केली होती. या संदर्भात निवेदन देत त्यांनी या प्रकरणाची चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी समितीने करावी, अशा मागणीचे निवेदन मुंडे यांनी दिले होते. त्यानंतर आज एसआयटीची घोषणा करण्यात आली.



# शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात बीडमधील शेतकऱ्यांची वज्रमुठ

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या जमिनी हिरावून घेणाऱ्या आणि त्यांना देशोधडीला लावणाऱ्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाविरोधात बीड जिल्ह्यातील शेतकरी आता चवताळून उठले असून मंगळवारी कृषिदिनाच्या दिवशी जिल्हाभर जोरदार रास्ता रोको करून शासनाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. परळी व अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर, धायगुडा पिंपळा, तळेगाव येथे शेकडो शेतकरी महिला व पुरुष रस्त्यावर उतरले. 'जमीन आमची, हक्क आमचा', 'महामार्ग रद्द झाला पाहिजे', 'शासन हाय हाय' अशा घोषणा देत महामार्ग रद्द करण्याची ठाम मागणी करत आंदोलन करण्यात आले.




शासनाने खोटी आश्वासने आणि पोलिसी बळ वापरून सीमांकन सुरू केले असून अधिकारी शेतकऱ्यांना धमकावत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. मात्र आता शेतकरी मूग गिळून गप्प बसणार नाही, अशा शब्दांत शेतकऱ्यांनी इशारा दिला. धायगुडा पिंपळा येथे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन दुपारी मुक्त केले.

या आंदोलनात एड. अजय बुरांडे, कॉ. मुरलीधर नागरगोजे, मोहन गुंड, कॉ. भगवान बडे, कॉ. मदन वाघमारे, व्यंकट ढाकणे, सुशील शिंदे, अरुण पाटील, दीपक शिंदे, एड. जावेद पटेल, मीनाताई डांगे, आशाबाई पवार आदींसह शेकडो शेतकऱ्यांनी ठिकठिकाणी रास्ता रोकोत सहभाग घेतला. सरकार

पान २ वर

# बीडमध्ये महिलांनी काढला कॅन्डल मार्च

## अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणी नागरिकांमधून संताप

बीड । प्रतिनिधी

शहरात अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळप्रकरणी संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि.३०) सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात कॅन्डल मार्च काढून निषेध व्यक्त केला. यावेळी सर्वस्तरातील महिला, युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



हातात कॅन्डल्स व मागण्यांचे फलक घेत सहभागी महिलांनी मुलगी आहे, अबला नाही, अत्याचाऱ्यांना माफी नाही; बीड जागं झालं,

पान २ वर

# पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाला भरदुपारी कुलूप अधिकाऱ्यांची बेपर्वाई उघड

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोमवारी नागरिक कामानिमित्त कार्यालय गेले मात्र अधिकाऱ्याच्या ऑफिसला कुलूप. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सरकारी कार्यालय बंद असणे म्हणजे प्रशासनाच्या बेशिस्त कारभाराचे जिवंत उदाहरण आहे. याला जवाबदार कोण?




या विभागाचे प्रमुख अधिकारी हे आपल्या जबाबदाऱ्या पूर्णपणे सोडून बेपर्वा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. कार्यालय वेळेत उघडण्याऐवजी, संपूर्ण बंद ठेवणे ही केवळ शिस्तभंग नव्हे, तर नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणणारी कृती आहे. सरकारी कामांमध्ये आधीच प्रचंड विलंब होतो, त्यात हे असं ऑफिसलाच कुलूप? मग आम्ही गाठायचं कोणाला? असे प्रश्न संतप्त नागरिक विचारत होते. काहींनी तर थेट व्हिडीओ काढून सोशल मीडियावर व्हायरल करत अधिकाऱ्यांच्या निष्काळजी कारभाराचा पर्दाफाश केला.

आता अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित निलंबनाची मागणी नागरिकांकडून होत आहे. पाटोदा सारख्या ग्रामीण भागात नागरिकांना वेळेवर काम न झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम होतात, हे प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. अधिकारी 'दाखवा आणि बक्षीस मिळवा' – प्रशासनावर जनतेचा दबाव अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवर बक्षीस जाहीर करण्याची योजना प्रशासनाने राबवावी, अशी मागणी आता जोर धरू

पान २ वर

# स्मार्ट अंगणवाड्या फक्त कागदावरच

## पावसाळ्यात गळक्या छिद्र पडलेल्या पत्र्यांचा निवारा तर पिण्याच्या पाणी व स्वच्छतागृहांची वानवा चिमुकल्यांची परवड सुरूच

बीड । प्रतिनिधी

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे. या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र स्मार्ट अंगणवाडी कागदावरच राहिल्या असुन कंत्राटदार पोसण्यासाठी अनावश्यक गोष्टींवर भरमसाठ खर्च होत असतानाच मुलभूत सुविधा मलांना सुरक्षित निवारा, पिण्याचे शुद्ध पाणी, वीजपुरवठा तसेच दरवाजे, खिडक्या दुरूस्ती व स्वच्छतागृहांची वानवा असल्याचे आढळून येते. संबंधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता मात्र शासन आणि प्रशासन स्तरावर अद्याप याची अंमलबजावणी झाली नसुन प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नसल्याची खंत डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

**वीजपुरवठाच नसल्याने एलईडी टीव्ही, वाटर प्युरीफायर धुळखात पडुन, कंत्राटदार पोसण्यासाठीचा अट्टाहास:- डॉ.गणेश ढवळे**

स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई लर्निंग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वाटर प्युरीफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठाच नसल्याने धुळखात पडुन असुन केवळ कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वाटर प्युरीफायरचा पुरवठा करण्यात आला आहे का? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.



**मराठवाड्यात ६३८ अंगणवाड्यांची कामे रखडली तर ९५ कामे वर्ष उलटुनही सुरूच नाहीत; ३७ कोटींचा निधी मंजूर केला होता**

कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील १३०० अंगणवाड्या स्वत:ची इमारत विना उघड्यावर झाडाखाली, समाज मंदिरात, पत्र्याच्या शेडमध्ये, किरायाच्या रूममध्ये भरतात. मराठवाड्यात मागील वर्षी ६३८ अंगणवाडी ईमारती मंजुर करण्यात आल्या होत्या. या इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कामाचे कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते. परंतु कंत्राटदारांनी या कामांना गती दिली नाही. एक वर्षापूर्वी मंजूर झालेल्या कामांची प्रगती केवळ १४.८९ टक्के आहे अर्थातच यात ४४२ कामे सुरू झाल्याचे कागदावर दाखविले जात असुन ९५ कामे तर अद्याप सुरुच झालेली नाहीत. या कामांसाठी शासनाने ३७.९६ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला आहे. सदरील कामे रखडली असतानाही शासन स्तरावरून याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही हे विशेष.

**अंगणवाडी कामांची स्थिती**

| पुर्ण – | प्रगती–सुरू –नाही |
|---|---|
| बीड – | ७५–७७–०० |
| संभाजीनगर – | ०२–२८–२० |
| जालना – | ०४–५४–०० |
| परभणी – | १०–११४–०० |
| हिंगोली – | ००–०७–०१ |
| नांदेड – | ००–१०७–४४ |
| लातुर – | ०४–२२–०० |
| धाराशिव – | ००–३३–३० |

**जिल्हा निहाय मंजुर अंगणवाड्या आणि अखर्चित (निधी) लाखात**

| | |
|---|---|
| संभाजीनगर – | ५०– ५५०.७० |
| बीड – | १५२–१२१० |
| जालना – | ५८–५३०.९७ |
| हिंगोली – | ०८–१६.९६ |
| परभणी – | १२४–४६० |
| नांदेड – | १५७–७११.७१ |
| लातुर – | २६–२९२.५० |
| धाराशिव – | ६३–६८.४२ |



## संत निरंकारी मंडळाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारा संत निरंकारी मंडळाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकूण ११० रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व निभावले. येथील संत निरंकारी भवनात पार पडलेल्या शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ संजय राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सदाफ शेख, बीड व अंबाजोगाई ब्लड बँक टीम, दिंद्रुड ग्रामस्थ उपस्थित होते. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या विचाराने प्रेरित होऊन, येथील प्रत्येक रक्तदात्याने रक्तदानास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदात्यांना बिस्किट, चहा, व नाश्त्याची व्यवस्था मंडळाच्या वतीने करण्यात आली होती. बीड जिल्हा रुग्णालय व अंबाजोगाई स्वाराती रुग्णालयाच्या ब्लड बँकेच्या टीमने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली रक्त संकलन केले. रक्त नाल्यात नव्हे तर रक्त नाडी त वहावे हे ब्रीदवाक्य घेऊन येथील संत निरंकारी मंडळाच्या सर्व सेवकांनी या शिबिराचे आयोजन करून पंचक्रोशीतील प्रतिष्ठित, ग्रामपंचायत सदस्य, हरदेव नगर, मोगरा, केसापुरी कॅम्प, पोहनेर, शिरसाळा, देव दहिफळ मोहखेड येथील रक्तदात्यांनी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तसंकलन करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण महाविद्यालय अंबाजोगाई व बीड येथील जिल्हा रुग्णालय ब्लड बँक अशा दोन ब्लड बँक रक्त संकलन करण्यासाठी आल्या होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिंद्रुड शाखेचे मुखी शंकर यादव सेवादल शिक्षक अमर जाधव, दिंद्रुड युनिटच्या सर्व सेवा सेवदानांनी सश्रम परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी केले.

## पंचायत समिती केज येथील अधिकाऱ्यांच्या निवासी इमारतीचे आठ दिवसांत उद्घाटन करा

### दलित अन्याय, अत्याचार निर्मुलन समितीचे निवेदन

केज । प्रतिनिधी

पंचायत समिती केज येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी केज शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी लाखो रुपयांच्या निधीतून उभारलेली निवासी इमारत दोन वर्षांपासून निष्क्रिय अवस्थेत धूळखात पडून आहे. सदर इमारतीचे तात्काळ उद्घाटन करून ती निवासी उपयोगासाठी खुली करावी, अशी मागणी दलित अन्याय अत्याचार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या निधीतून बांधलेली ही इमारत पूर्ण होऊन दोन वर्षे झाली असूनही अद्याप त्याचे उद्घाटन झालेले नाही. त्यामुळे सदर इमारत शहरातील रोड रोमिओंसाठी अड्डाबनत असून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत आहे.लाखो रुपयांचा शासकीय निधी वाया गेल्याची भावना जनतेत आहे.



निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की,येत्या आठ दिवसांच्या आत जर इमारतीचे उद्घाटन करून ती अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासी वापरासाठी खुली करण्यात आली नाही तर केजशहरातील बेघर व दलित कुटुंबांकडून त्या इमारतीचे उद्घाटन करून त्यांना निवासा साठी खुली केली जाईल. यासाठी होणाऱ्या पुढील आंदोलनात्मक कारवाईस संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर असेल असा इशारा देखील निवेदनात देण्यात आला आहे. हे निवेदन रोहित कसबे लखन हजारे, अशोक गायकवाड, प्रवीण मस्के, योगेश गायकवाड, शरद धिवार आणि निलेश साखरे यांच्या हस्ते गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

## पथदिव्यांची लाईट नसल्यामुळे फुले दांपत्याच्या फोटोवर पडला अंधार!

### नसता क्रांतीची मशाल पेटवत आंदोलन करु : जवंजाळ

गेवराई । प्रतिनिधी

नगर शहरातील महात्मा फुले सिटी सेंटर येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेवर प्रकाश पडणारा पथदिवा गेल्या काही दिवसांपासून बंद आहे त्यामुळे अंधार झाला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप याकडे गेवराई नगरपरिषद कार्यालयातील विद्युत विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सावता परिषदेचे शहराध्यक्ष अश्विन जंवजाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.



महामानवाचा फोटो अंधारात ठेवणाऱ्या गेवराई नगरपरिषदेला प्रशासनाला जाग कधी येणार? नगर परिषद प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून प्रोफेसर रस्त्यांवर पथदिव्यांसाठी खांब बसवले आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून हे खांब उभे करण्यात आले आहेत. मात्र, महात्मा फुले सिटी सेंटर येथील फोटोवर पथदिवा न बसवल्याने संपूर्ण अंधार असतो म्हणून समस्त माळी समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जातं आहेत तसेच कार्यालयाच्या कामकाजात प्रशासक असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक विविध कामासाठी या कार्यालयात ये-जा करत आहे मात्र येथील कर्मचारी निगरगट्ट असल्यासारखे वागतात म्हणून सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे पाहायला मिळाले याबाबत विद्युत विभागाला वारंवार तोंडीं व लेखी तक्रार करत पथदिवे बसवण्यासाठी नेहमीच मागणी करत आलो. तरीही अधिकारी या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी या फुले दाम्पत्यांच्या प्रतिमेजवळ क्रांतीची मशाल पेटवत आंदोलन करण्यात येईल असाच इशारा शहराध्यक्ष अश्विन जवंजाळ यांनी दिला आहे.

## आ.विजयसिंह पंडित साहेब शाळा आहे की मृत्युचा सापळा?

### गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या धोकादायक : डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यातील २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. जिल्हयात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन कुठे भिंती कुजलेल्या तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत असुन वादळ वाऱ्यासह आलेल्या पावसाने अपघाताची शक्यता आहे. गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन यांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणींची आवश्यकता आहे त्यामुळे याकडे लक्ष देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी गेवराईचे आ.विजयसिंह पंडित यांना केली आहे.



गेवराई तालुक्यातील बंगालीपिंपळा येथील जिल्हा परिषद शाळा अखेरच्या घटका मोजत आहे. सन १९५१ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत १ली ते ८ वी पर्यंत वर्ग भरत असुन एकुण ८ वर्ग खोल्यात जवळपास ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिर्ण झालेल्या वर्गखोल्यांची दुरावस्था पाहता वादळ वाऱ्यासह आलेल्या पावसाने केव्हाही कोसळु शकतात. वर्गखोल्यांमध्ये पावसाच्या पाण्याची गळती, भिंतींना गेलेले तडे, काही भिंतीवरचा भाग निघुन पडत आहे. यामुळे वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा आणि शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचाही जीव धोक्यात आहे. जीर्ण झालेल्या शाळेच्या ठिकाणी नवीन इमारत बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी वारंवार शिक्षण विभागाला केली आहे. मात्र शिक्षण विभाग आणि लोकप्रतिनिधी याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता मध्ये साने गुरुजी निवासी विद्यालय, केजला ५१ हजाराचे रोख पारितोषिक

केज । प्रतिनिधी

गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता मध्ये येथील बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालय, केज या शाळेला महाराष्ट्रातील तालुका स्तरातुन तालुकास्तरीय प्रथम क्रमांक, सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र रोख रक्कम ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आला. हा पुरस्कार सोहळा जळगाव येथील जैन हिल्स वरिल गांधी तिर्थच्या कस्तुरबा सभागृहात रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी साडे नऊ वाजता संपन्न झाला.



या पुरस्कार सोहळ्यास पुणे येथील सागर मित्र अभियानचे सह संस्थापक विनोद बोधनकर, जळगाव जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाचे राज्यसल्लागार परिषदेचे सदस्य अनिल बोरनाले, गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त तथा जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेडचे अध्यक्ष श्री. अशोक जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री.गिरिष कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पाटील यांनी केले या कार्यक्रमासाठी राज्यातुन विविध शैक्षणिक संस्थेचे संस्था चालक, मुख्याध्यापक, समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रातिनिधिक स्वरूपात मुख्याध्यापक, समन्वयक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच वर्षभरात शाळेत राबविण्यात आलेले स्वच्छता विषयाचे उपक्रमाचे व्हिडिओ सादर करण्यात आले.

प्लास्टिक कच-याचे दुष्परिणाम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन श्री. विनोद बोधनकर यांनी केले मानव व सजिव जात वाचवण्यासाठी जनजागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे. वैज्ञानिक दृष्टीकोन, आध्यात्मिक मुल्य, लोकसहभाग आणि जागतिक नागरिकत्व या संकल्पनेतून ज्ञान, विज्ञान आणि कर्मयोग शिकवले पाहिजे, जमिनीवर ३०% जंगले असुन त्यावर कुर्हाड घालविण्याचे काम केले जात आहे. जमिनी पेक्षा खा-या पाण्यातील जंगले ७०% आक्सिजन देतात. प्लास्टिकच्या आती वापरामुळे ओढे, नाले, नदी मार्फत समुद्रापर्यंत पोहचवुन सर्वात मोठ्या प्रमाणात कुर्हाड आपण प्रत्येक जण चालवत आहोंत. मुलामध्ये प्लास्टिक विषयी जागरूकता निर्माण करुन प्लास्टिकचे येणारे संकट विद्यार्थ्यांनी दुर करावे या विषयी विनोद बोधनकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षयी समारोप करताना श्री. अशोक जैन यांनी सार्थक करु या जन्मांचे रुप पालटु वसुंधरेचे या प्रमाणे आपण जन्माला आलो त्यापेक्षा परिसर अधिक सुंदर करून सोडले पाहिजे याच संस्कारातुन प्रत्येक सहकारी जैन हिल्स येथे कार्य करतो त्याच्यातुनच गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता समोर आली. भविष्य काळात यांचे स्वरुप मोठे करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष अँड.श्री. उद्धवराव कराड, प्रा.डॉ. कविताताई कराड मॅडम, कु.साक्षी कराड, पवार ज्ञानेश्वर, चाटे लहु, दस्तुरे कपिल, सोनवणे आदी उपस्थित होते.

## बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

केज । प्रतिनिधी



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, आंबाजोगाई येथून मे – जुन २०२५ घेण्यात आलेल्या बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस (ग्रंथालय व माहिती शास्त्र) पदवी परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे ६८. ३०% गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. आनंद वसुदेव गायकवाड हे स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता.केज जि. बीड मध्ये कार्यरत आहेत.

आनंद वसुदेव गायकवाड यांनी गंथालय व माहिती शास्त्र बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस मध्ये ६८.३०% गुण घेवून उत्तीर्ण झाल्याबद्दल आंबाजोगाई सेंटरचे संचालक डॉ. पी. सी. गादेकर, डॉ. मधुबाला, प्रा.डॉ. आशा गायकवाड, प्रा.डॉ. मुंडे, प्राध्यापक वृंद तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड चे संस्थापक अध्यक्ष, प्रचार्य, डॉ. वसुदेव (बप्पा) गायकवाड, उपाध्यक्ष मुरलीधर शिंदे, सचिव सौ. छायाताई सोमवंशी, सहसचिव ज्ञानोबा भोगजकर, सदस्या सौ. सुमनताई गायकवाड, तसेच मित्रपरिवारांकडून आनंद (भैय्या) गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.

### खा.सुप्रिया सुळे यांचा जन्मदिन सामाजिक उपक्रमाने साजरा

## परळी उपजिल्हा रुग्णालयात रूग्णांना फळांचे वाटप; अनेक ठिकाणी वृक्षारोपण

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकसभेतील संसदरत्न खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सौ.सुप्रियाताई सुळे यांचा सोमवारी जन्मदिवस असल्याने परळी वैजनाथ येथे अनेक सामाजिक उपक्रम घेण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

परळी वैजनाथ येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा, संसदरत्न खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांचा जन्मदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.



जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील, पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाने अनेक उपक्रम राबवण्यात आले. सकाळी ११ वाजता उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर १२ वाजता विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुण गुट्टे, पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ड.सतीश देशमुख, डॉ.संदीपान काळे, नितीन शिंदे, मुक्तराम गवळी, रमेशराव ढाकणे, पांगरीचे राजेभाऊ फड, रामभाऊ राडकर, वर्षाताई रायभोळे, दिपाली सावंत, मंगलताई सोळंके, फिरोज सय्यद, रामचंद्र देवकते, रेखाताई जानराव, अश्विनीताई सरवदे, समाधान मुंडे, सनी मस्के, डॉ.बोरा, गोपाळ सलगर, हनुमंत फड, प्रल्हाद गित्ते, इमरोज खान, शेख फिरोज, प्रद्युम्न मुंडे यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या बीड जिल्हाप्रमुख पदी रवी मुडेगावकर यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी



शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांच्या सूचनेवरून बांधकाम कामगार सेनेचे प्रमुख प्रीतम शेठ धारिया यांच्या संमतीने मराठवाडा प्रमुख विनोद नेमाडे यांनी शिवसेना संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे व जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या शिफारशीवरून शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या परळी व केज/ अंबाजोगाई विधानसभा क्षेत्राच्या जिल्हाप्रमुखपदी रवी मुडेगावकर यांची नियुक्ति करण्यात आली आली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात पुन्हा एकदा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करुन शिवसेनेला बळ देण्याचे काम सुरु आहे. शिवसेनेमध्ये युवकांना पद देऊन मानाचे स्थान देण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी रवी मुडेगावकर यांची निवड करण्यात आली. परळी व केज/अंबाजोगाई विधानसभा क्षेत्राची जबाबदारी मुडेगावकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मुडेगावकर यांचे स्वागत केले आहे.

## पुणे येथे नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन.एस.इ.) मार्फत एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

पुणे । प्रतिनिधी

दिनांक ३० जून २०२५ रोजी पिंपरी चिंचवड मोरवाडी आय टी आय कॉलेज येथे भारत सरकार च्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) च्या माध्यमातून आय टी आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य श्री.शशिकांत पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच एन.एस. इ.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.जी.बी.चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या विविध योजना, तसेच पोस्ट ऑफिस मधील असलेल्या विविध योजना, डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री के.बी खरात सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन तसेच सूत्रसंचालन केले. सदरील कार्यक्रम हा दोन बॅचमध्ये घेण्यात आला. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड मधील सहकार संकुलाच्या उभारणीसाठी दहा कोटी रुपयांची तरतूद

## आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश, उपमुख्यमंत्री ना अजित पवार यांचे मानले आभार




मुंबई । प्रतिनिधी


राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर बीड जिल्ह्याच्या वैभवात भर पडेल अशा अनेक विकासकामांना त्यांनी मंजुरी दिली आहे. बीड शहरातील सहकार विभागाच्या मालकीच्या जागेत भव्य सहकार संकुलाची इमारत उभी करण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. आ. पंडित यांच्या मागणीला दादांनी प्रतिसाद देत दि.४ जून रोजी सहकार संकुलाच्या बांधकामासाठी १४ कोटी ९८ लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली होती. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये या कामासाठी १० कोटी रुपयांची भरीव तरतुद केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे बीड शहरात सहकार विभागाला देखणी वास्तू मिळणार आहे.

बीड शहरातील जालना रोड भागात नगर भुमापन क्र.१७९९ मधील सहकार विभागाच्या मालकीच्या जागेत सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम करावे यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. सहकार विभागाच्या अधिपत्याखालील दहा क्षेत्रीय कार्यालयांना एकाच इमारतीमध्ये यामुळे जागा मिळणार आहे. एका छताखाली ही कार्यालये एकत्रित आल्यामुळे सर्वसामान्य लोकांना यामुळे सुविधा मिळणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पडेल अशी देखणी वास्तु त्यांच्या कारकिर्दीत उभारली जावी यासाठी आ. विजयसिंह पंडित प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे सहकार संकुल इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी ९८ लक्ष रुपयांच्या कामाला दि.४ जून रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाली होती.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड शहरातील सहकार संकुलाच्या इमारत बांधकामासाठी पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये दहा कोटी रुपयांची भरीव तरतुद केली आहे. बीड शहराच्या मध्यवस्तीमध्ये मोक्याच्या ठिकाणी नगर भुमापन क्र.१७९९ मधील १५१५.९७ चौ.मिटर जागेवर ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य आणि देखणी वास्तु उभारण्यात येणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत माहिती देताना सांगितले. जिल्हा उपनिबंधक कार्यालयासह सहकार विभागाशी संबंधित दहा कार्यालये एकाच छताखाली या माध्यमातून येणार असून त्यामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येऊन सर्वसामान्य नागरीकांना त्याचा लाभ होणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी दहा कोटी रुपयांची भरीव तरतुद केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

### तलवाडा येथील गाव तलावाच्या भराव भिंती लगट अतिक्रमण वाढल्याने तलाव फुटन्याचा धोखा वाढला!

# तलवाडा ग्रामपंचायतने अर्थिक मलिद्यासाठी गावाला संकटात टाकले : सौदागर, शिंगने




तलवाड़ा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायतच्या मलिदा लाटु भूमिकामुळे गाव तलावाच्या भराव भिंती लगट मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असुन सार्वजनिक पाणी पुरवठा करणा-या पाईप लाईनवर आतिक्रमण धारकांनी पक्के बांधकाम करुन पाणी पुरवठ्याला देखील अडथळा निर्माण केल्याने वेळेवर पाणी पुरवठा होत नसल्याचे गावक-यांचे म्हणने असुन तलावाच्या भराव भिंतीच्या लगट वाढलेल्या आतिक्रमणमुळे तलाव फुटन्याचा धोखा वडावला आसल्यामुळे गाव व गावक-यांचे हित लक्षात घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन सौदागर व जयदेव शिंगने यांनी संबंधित प्रशासनास निवेदन दिले.

निवेदनात म्हणटले आहे की, तलवाडा ग्रामपंचायत ला प्रशासक म्हणून काम पाहत असलेलें चोपडे साहेब व ग्राम विकास अधिकारी मुसळे यांनी मलिदा पायी बोटावर मोजण्या इतक्या लोकांना गाव तलाव भराव भिंतीच्या लगट कोरून अतिक्रमण करावे लावले का? मागील विस पंचवीस वर्षापासून ज्यांच्या ताब्यात ग्रामपंचायत होती त्यांनी पण बरीच गायराण जमीनीवर ताबा केला व आपल्या मालकीची केली. ग्रामपंचायतला पी टी आर देण्याचा अधिकार कोणी दिला ? असा प्रश्न निवेदनात उपस्थित केला गेला असुन गाव तलावाची संरक्षण भीत खुले आम कोरून अँगल पत्राचे शेड या ठिकाणी मारलेले असुन काहींनीतर पक्के आर सी सीचे बांधकाम केले तहसीलदार च्या दुर्लक्षपणामुळे भविष्यात गाव तलाव फुटण्याचा गावास धोखा आहे. विशेष म्हणजे या बांधकामाखालून तलवाडा येथील सार्वजनिक बारव विहीर, वरून होणारी पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन आहे. तसेच जायकवाडी वसाहत या ठिकाणी सुद्धा पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन आहे. या दोन्ही पाईप लाईन बंद झाल्याने नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे.

जिल्हाधिकारी साहेब यांनी गाव तलाव वाचवण्यासाठी तात्काळ अतिक्रमण काढून शासनाच्या आदेश नसताना ज्यांनी ज्यांनी पी टी आर दिले त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आसे ही निवेदनात शेवटी शेख खिजर जैनोदीन सौदागर व जयदेव शिंगने यांनी म्हटले आहे.

### आम्ही शेती करतो म्हणून तुम्ही बसून खाता आत्मदहन करणाऱ्या शेतकऱ्याचा आक्रोश

# २०१९ पासून शेतकरी मागतोय शेताला वाट

परळी । प्रतिनिधी



परळी तालुक्यातील सिरसाळा येथील जमीनच्या वाटाला का लागतोय वेळ तो प्रशासनाचया दिरंगाईला आणि काम न करण्याला वैतागून गेला. तो तहसील कार्यालयासमोर आला.

अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहन करू लागला तोच पोलीस धावले आणि त्याला पकडले परंतु शेतकरी मात्र शासन व प्रशासन यांच्या विरोधात आता ओरड करत होता. आम्ही शेती करतो म्हणून तुम्ही खाता हे सांगत होता आणि तुम्ही शेतकऱ्याला हाकलून देता असा आक्रोश करीत होता. यावेळी पोलीस व उपस्थित पत्रकारला बोलताना सिरसाळा येथील शेतकरी ज्ञानेश्वर दहिफळे शंतापुन सांगत होता. मी २०१९ पासून माझ्या शेतजमिनीला शेतरस्ता काढुन देवा पण तहसील प्रशासन माझ ऐकत नाहीत तहसीलदार मला हाकलून देत. आहेत म्हणून नाईलाजाने मि आठ दिवसांपुर्वी आत्मदहनाचा इशारा दिला होता. दरम्यान आज दिनांक ३० जुन रोजी दुपारी १२ वाजता ज्ञानेश्वर दहिफळे यांनी तसेस कार्यालयासमोर स्वतःच्या अंगावर पेट्रोल टाकून घेतले तोच पोलीसानी तात्काळ धाव घेतली. आणि दहिफळे यांना ताब्यात घेतल्यामुळे यांचा जीव वाचला परंतु प्रश्न आहे न्याय मागणीसाठी दहिफळे यांनी स्वतःच्या जीव पणाला लावला आहे तो प्रश्न आता तरी सुटणार आहे का असा शेतकरी परळी तहसील कार्यालय समोर आरडा ओरड करत होता. आता तरी प्रशासनाने यावर लक्ष घालून ज्ञानेश्वर दहिफळे यांना शेतीच्या रस्त्यासाठी प्रयत्न करा की विनंती शेतकऱ्यांनी केली आहे.

# प्रशासन आता गावात आले आहे, समस्या सांगा - उत्तर मिळेल : तहसीलदार शेळके




बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील समनापुर येथे पाली महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर सोमवार दि ३० जून रोजी राबविण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सकाळी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे होते. नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, सुरेंद्र डोके, नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे, मंडळ अधिकारी सतीश बांगर, अव्वल कारकून राहुल कसबे, अमोल कणसे, महेंद्र राऊत, कोल्हारवाडी दत्त संस्थांनचे मठाधीपती श्रीहरी पवार महाराज उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन पाली महसूल मंडळाच्या मंडळ अधिकारी शीतल चाटे व पाली महसूल मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी केले होते.

या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. यामध्ये जिवंत सातबारा मोहीम, फार्मर आयडी, श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना डी बी टी करणे, नकाशावरील शेत रस्ते मोकळे करणे, त्यामुळे निर्माण होणारे वाद आपापसात सामंजस्याने मिटवून घेणे तसेच उपस्थितांना फार्मर आयडीचे महत्त्व त्यांनी पटवून सांगितले. आपल्याला फार्मर आयडीमुळे विविध योजनांचा लाभ घेता येईल, यामध्ये महसूल विभागाच्या सर्व योजना असतील, कृषी विभागाच्या योजना असतील तसेच इतर योजना असतील, याला फार्मर आयडी कंपल्सरी केलेला आहे. फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात साठवली जाईल, ज्यामुळे त्यांना कागदपत्रांकरीता हेलपाटे मारण्याची गरज पडणार नाही. तसेच त्यांनी उपस्थितांना जिवंत सातबारा मोहिमेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचे आवाहन केले व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपापला फार्मर आयडी काढून घेण्याचे देखील आवाहन केले.

या कार्यक्रम प्रसंगी नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना विषयी माहिती दिली. महसूल विभागाविषयी कोणत्याही अडचणी आपल्याला आल्यास अशा अडचणी सोडवण्यासाठी महसूल विभाग कटीबद्ध असल्याचे नमूद केले. यावेळी नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महसूल प्रशासन वेळोवेळी शासनाने राबवलेल्या योजनांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचत असते, तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचे ग्राम महसूल अधिकारी व संपूर्ण महसूल विभाग कटिबद्ध आहे असे सांगितले. मंडळ अधिकारी शीतल चाटे यांनी पाली मंडळ अंतर्गत उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना जिवंत सातबारा मोहिमेचे महत्त्व समजून दिले तसेच शेतकऱ्यांना महसूल विभागाशी निगडित कोणत्याही अडचणीसाठी महसूल विभागाचे कर्मचारी सदैव तत्पर आहेत अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र, रहिवासी दाखले जातीचे प्रमाणपत्र, सहा क प्रमाणपत्रे, श्रावण बाळ लाभ प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना लाभ प्रमाणपत्र, कृषि विभागाच्या वतीने बियाणे इत्यादींचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास दत्त संस्थान कोल्हारवाडीचे पवार महाराज, आहेर वडगाव चे सरपंच सुशेन खरसाडे, कोल्हारवाडीचे सरपंच अशोक शिंघन, समनापूर सरपंच बाबु गोरे, दीपक हजारे, चंद्रसेन गोरे, कोळवाडी चे सरपंच तुळशीदास महाराज शिंदे, तुषार शेळके, गिरजाप्पा घाडगे, अक्षय घाडगे, शिवलाल शिंदे, अक्षय पवार, आहेर वडगाव चे पोलीस पाटील सखाराम काटे, बाबासाहेब रांजवन सर, पाली महसूल मंडळ अंतर्गत ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड, मीनल खांदे, राधिका बहिर, जितेंद्र शेळके, विलास उबाळे, कृषी सहायक सरिता शिंदे इत्यादी उपस्थित होते. तसेच पाली महसूल मंडळातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर मंडळातील सीएससी चालक तसेच पाली महसूल मंडळातील शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गृहमंत्री ना सवाल, विजय पवार हा पोलीस प्रशासनाचा जावई आहे का? : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी



बीड शहरात एकच खळबळ उडालेली आहे. शहरातच नव्हे जिल्ह्यात नाव गाजलेले शैक्षणिक कोचिंग क्लासेस म्हणून उमा किरण या ठिकाणी क्लासेस घेतले जातात. लाखो रुपये देऊन पालक आपल्या मुलामुलींना विश्वासाने शिक्षणासाठी पाठवितात परंतु बाहेरचे सोडा आतील दोन हरामखोर शिक्षकच भक्षक झाल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत किती अल्पवयीन मुलीवर या दोन हरामखोरांनी हात घातलेला आहे. हे चौकशी दरम्यान कळेल पण त्या हरामखोरांना नागडं करून कोर्टात न्यायला पाहिजे होते. परंतु त्यांना पोलीस प्रशासनाने साधी हातकडी सुद्धा लावलेले नाही. त्याच्यामागे कोणाचे हात आहे. यांचा आका कोण आहे. त्याची चौकशी व्हायला पाहिजे. या दोन प्राध्यापकांना कठोर शिक्षा व्हायला पाहिजे. आणि शहरातील प्रत्येक कोचिंग क्लासेस सरकार मान्य आहे का? याची पण चौकशी व्हायला पाहिजे. आणि कॉलेज शाळा या ठिकाणी जे मुले मुलींना छेडछाड करीत आहे यांच्यावर पण कारवाई झाली पाहिजे. तसेच पालकमंत्री साहेब. आपली पण जिम्मेदारी आहे की, बीड जिल्ह्यात काय घडत आहे याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

# खाजगी कोचिंग क्लासेसवाल्यांची मनमानी खपवून घेतली जाणार नाही : विकास गायकवाड

गेवराई । प्रतिनिधी



खाजगी क्लासेसच्या नावाखाली शहरात सुरू असलेले घाणेरडे प्रकार संतापजनक असून जिल्ह्याभरात खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणात चालत आहे. या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण देणारे शिक्षक यांचे चारित्र्य प्रमाणपत्र तपासणे अत्यंत गरजेचे झाले असून आत्ताच झालेल्या बीड शहरात उमाकीरण शैक्षणिक संकुलमध्ये घडलेल्या प्रकारामुळे पालक वर्गात संताप व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हाभरात खाजगी क्लासेस वाल्या विरोधात पालक वर्गातून नाराजीव्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे खाजगी क्लासेस मधील मुलींच्या सुरक्षेतेच्या प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील बहुतांश खाजगी क्लासेस समोर मुलींची छेडछाड करणे विनयभंग करणे असले निंदनीय प्रकार घडत असतात अशा निंदनीय प्रकारास सर्वस्व क्लासेसचे संचालक जबाबदार असतात कारण बहुतांश क्लासेस समोर काही कारण नसताना सुद्धा काही टवाळखोर मुलं विनाकारण थांबलेले असतात क्लासेस वाल्याने विद्यार्थी सुटण्याच्या वेळेस एक पोलीस डिपार्टमेंटचा माणूस गेट समोर असणे अनिवार्य असले पाहिजे. प्रतेक खाजगी क्लासेस हा सीसीटीव्हीच्या निगराणित असला पाहिजे जोपर्यंत सर्व विद्यार्थी त्यांच्या स्वतःच्या घरी पोहोचत नाहीत तोपर्यंतची सर्व जिम्मेदारी क्लासेस वाल्यांची असली पाहिजे. त्यामुळे असले निंदनीय प्रकार घडणार नाहीत यांची काळजी घेतली पाहिजे जर का एखाद्या क्लासेस समोर अशी निंदणी घटना घडली तर अशा घटनेस सर्वस्व जबाबदार क्लासेस वाल्याला धरून त्यांच्यावर सुद्धा योग्य ती कारवाई केली पाहिजे पालक आपल्या मुलांचे भविष्य घडविण्यासाठी खाजगी क्लासेस मध्ये मोठी फीस भरून ऍडमिशन घेतात त्या क्लासेस मध्ये आपल्या मुलांना शिकवण देणारे शिक्षक यांची सुद्धा चारित्र्य तपासणी अनिवार्य असले पाहिजे आशा विकृत लोकांमुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे. तरी यापुढे बीड जिल्ह्यातील सर्व क्लासेस वाल्यांना यापुढे जर का असे प्रकार झाल्यास आमच्या विद्यार्थी मित्रासाठी व आमच्या लाडक्या बहिणीच्या रक्षणासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष मैदानात उतरेल जर का शहरातील कुठल्याही क्लासेस समोर असे प्रकार आमच्या निदर्शनास आले तर आम्ही महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने खाजगी क्लासेस वाल्यांच्या तोंडाला काळे फासले जाईल, असा थेट इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# कोचिंग क्लासेस बंद करा नाहीतर शाळा आणि कॉलेज बंद करा

## शिक्षणाचा हा गोंधळ कोण सोडविणार : शेख इमरोज शरीफ

बीड । प्रतिनिधी



आज आपल्या शहरात कोचिंग क्लासेसचं जाळं इतकं विस्तारलेलं आहे की, आता गल्लोगल्ली क्लासेस सुरू झालेत. विशेष म्हणजे यापैकी अनेक कोचिंग क्लासेसची अधिकृत नोंद शैक्षणिक विभागाकडे आहे की नाही, हेसुद्धा स्पष्ट नाही. परवानगीची प्रक्रिया झाली आहे का? कोणते निकष पाळले गेलेत? हे सारे प्रश्न अनुत्तरितच आहेत. आज हजारो रुपयांच्या फी घेऊन ही कोचिंग क्लासेस धडधडीत व्यवसाय करतायत. मग सरकार शाळा आणि कॉलेजवर खर्च का करतेय? त्या संस्थांची गुणवत्ता का सुधारत नाही? आज पालकांना आपल्या मुलांना शाळा–कॉलेजसोबतच महागड्या कोचिंग क्लासेसमध्ये पाठवावं लागतं, ह्याचा अर्थ शाळांमध्ये शिक्षण योग्य पद्धतीने दिलं जात नाही का?

शाळा आणि कॉलेजमध्ये जे काही शिकवलं जातं, ते पुरेसं नाही का? की शिक्षकांकडून योग्य मार्गदर्शन मिळत नाही? की अभ्यासक्रम समजण्यास कठीण आहे? की फक्त गुण मिळवणं हाच उद्देश झाला आहे? ही परिस्थिती गंभीर आहे. सरकारला याकडे गांभीर्याने पाहावं लागेल. जर शाळा–कॉलेज निष्क्रिय होत असतील तर मग त्या बंद करून फक्त कोचिंग क्लासेसच सुरू ठेवावेत का? पालकांना एवढे पैसे का खर्च करावे लागतात? आणि एवढे पैसे घेणारे कोचिंग क्लासेस शिक्षण खात्याच्या रडारवर आहेत का? त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही होणार आहे का?

सरकार एकीकडे शिक्षणासाठी हजारो कोटींचा निधी खर्च करते, शिक्षक भरती करते, शाळा उभ्या करते आणि दुसरीकडे लाखो विद्यार्थी फक्त कोचिंग क्लासेसवर अवलंबून राहत आहेत. हे चित्र चिंताजनक आहे. प्रश्न असा आहे की – शिक्षण व्यवस्था शाळांमध्ये सक्षम का होत नाही? का शिक्षण हा आता केवळ खासगी उद्योजकांचा उद्योग झाला आहे? आणि सर्वसामान्य पालक त्याच्या गर्तेत अडकत चालले आहेत. शासनाने या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि कोचिंग क्लासेसच्या बेकायदेशीर वाढीवर लगाम घालावा आणि सरकारने त्वरित लक्ष घालून सर्व कोचिंग क्लासेसची चौकशी करावी, परवानग्या तपासाव्यात आणि नियमबाह्य क्लासेसवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# शासकीय आय.टी.आय आणि एस.टी.आगाराचे खासजीकरण करु नका

## बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



शासकीय आय.टी.आय आणि एस.टी.आगाराचे खासजीकरण करू नका सदरचा प्रस्ताव तात्काळ थांबवा अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत सोमवारी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सोमवार, दिनांक ३० जुन २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी नुकतीच एक बैठक बोलावून शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीकडे दत्तक देण्याचा निर्णय केलेला आहे. याचा आम्ही जाहिर निषेध करीत आहोत. सर्वप्रथम आय.टी.आय. या शिक्षणाचा उद्देश काय आहे हे पहावे लागेल. 'कुशल कामगार तयार करणे व विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे' हे आय.टी.आय.चे उद्दिष्ट असते. राज्यात शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था ४१९ आहेत. तर खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ५८८ आहेत. या संस्थांमध्ये दरवर्षी जवळपास १ लाख ५० हजार विद्यार्थी प्रवेश घेतात आणि कुशल कामगार बनून बाहेर पडतात. आय.टी.आय मध्ये प्रवेश घेण्याचा विद्यार्थ्यांचा कल वाढलेला असून त्याचे कारण, विद्यार्थ्यांना आय.टी.आय. करीत असताना १२ वी ची परीक्षा देण्याची सवलत देण्यात आलेली आहे आणि आय.टी.आय. झाल्यास अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला थेट प्रवेश मिळण्याची सोय सुद्धा करण्यात आलेली आहे. मात्र सरकारचे म्हणणे आहे की, आय.टी.आय.ला प्रवेश घेवू इच्छिणाऱ्यांचे प्रमाण फार कमी झालेले आहे. हे साफ चूकीचे आहे. त्याचे कारण कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून आय.टी.आय. मध्ये सार्वजनिक खासगी भागीदारीला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर येथे मंत्री व अधिकारी यांनी बैठक घेऊन कालबाह्य अभ्यासक्रम, जुने तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या अभावामुळे कुशल कारागीर देण्यास शासकीय आय.टी.आय. मागे पडत आहेत. असे मत व्यक्त केलेले आहे. हे खोटे असून सरकारचे मत हे नाकर्तेणाचे लक्षण दिसत आहे. शासकीय आय.टी.आय. मध्ये शिक्षक नेमणूकीची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात बेकारीला सामोरे जावे लागणार आहे. तसेच शासकीय आय.टी.आय. कडे आज रोजी मोठ्या प्रमाणात सरकारी जमीनी आहेत. त्या जमीनीवर खाजगी कंपन्या आपले उद्योग उभे करून सरकारची मालमत्ता कमी पैशाने हडप करू शकतात आणि वेगळी ज्यादा फीस आकारण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने शासकीय आय.टी.आय. हे खासगी कंपनीच्या घशात घालण्याचे पाप करू नये. तसेच दुसरा मुद्दा असा की, महाराष्ट्रातील एस.टी.आगाराच्या जागेच्या खासगीकरणाचा घाट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घातलेला आहे. महाराष्ट्रातील तालुक्याच्या किंवा लहान शहराच्या मध्यभागी एस.टी.आगाराच्या मालकीच्या हजारो एकर जागा आहेत. त्याला भारताचे नियंत्रक महालेखा परीक्षकांनी (कॅग) यांनी सरकारी जागांचे खासगीकरण करताना योग्य प्रकारे त्याची दखल घेतली जात नाही असे ताशेरे केले आहेत. त्या जागा उद्योगपतींना देण्यासाठीच सरकारची खटाटोप चालू आहे. एस.टी. ही गोरगरीब लोकांची जीवनवाहीनी आहे. तिला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याऐवजी सरकारने ते उद्योगपतींच्या घशात घालण्याचा घाट घातला आहे. त्या ऐवजी महाराष्ट्र सरकारने तुकाराम मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यकठोर, प्रामाणिक अधिकाऱ्याची समिती नेमून सरकारनेच स्वतः त्या एस.टी.आगाराच्या जागेचा विकास करावा. त्यामुळे एस.टी. आर्थिक तोट्यातून बाहेर पडण्यास मदत होईल आणि खासगीकरण थांबविता येईल. कारण, यापुर्वी खासगीकरणातून विकसीत करण्यात आलेल्या एस.टी.च्या जागेचा पुर्वानुभव फारसा चांगला नसल्याचे एस.टी.च्याच अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी सांगण्यात आले आहे. श्वेतपत्रिका काढून एस.टी.कशी नफ्यात आणतो आहोत हे आशेचे गाजर फसवे आहे.

विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे जेव्हा विरोधी पक्षनेता होते. तेव्हा त्यांनी 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे' सरकार मध्ये विलिनीकरण करण्याची मागणी केली होती. तेच मा.देवेंद्रजी फडणवीस आता मुख्यमंत्री असताना मात्र एस.टी.महामंडळाच्या जागा ह्या विकासाच्या नांवावर उद्योगपतींना कवडीमोल किंमतीमध्ये विकण्याचा घाट घालत आहेत. हे खासगीकरण थांबविले नाही. तर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.डॉ.सुरेश माने साहेब यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रामध्ये फार मोठे आंदोलन उभे करील. आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. असा इशारा बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव ॲड.माणिक बन्सी आदमाने (अंबाजोगाई) यांनी दिला आहे. सदरील निवेदनावर ॲड.वसंत हजारे, राजाभाऊ आदमाने, भारत (मामा) होके, अमोल तरकसे, अविनाश ओव्हाळ, प्रकाश शिंदे, लक्ष्मण वाघे, विठ्ठल तरकसे, सचिन मस्के, सिध्दार्थ होके, बाळासाहेब होके, अमर होके, अशोक शिंगाडे, सुनिल होके, अमोल आदमाने, प्रमोद आदमाने आणि अरविंद आदमाने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT